प्रेसनोट दि. २१/०७ /२०२२

**राजेंद्र बळवंत हुजरे ,कनिष्ठ अभियंता शहर पाणीपुरवठा विभाग कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर यांनी लाच रक्कमेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

यातील तक्रारदार हे कोल्हापूर महानगरपालिके कडील मान्यता प्राप्त प्लंबर आहे. त्यांनी त्यांचे ग्राहकांचे नविन नळ पाणी कनेक्शन जोडणेचे प्रकरण मंजुरी करीता कोल्हापूर महानगरपालिकेतील शहर पाणी पुरवठा विभागाकडे सादर केले आहे. तक्रारदार यांचे ग्राहकांचे नविन नळ पाणी कनेक्शन जोडणीचे प्रकरण मंजुर करणे करीता राजेंद्र बळवंत हुजरे कनिष्ठ अभियंता शहर पाणीपुरवठा विभाग कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर यांनी तक्रारदार यांचेकडे दोन्ही प्रकरणांचे मिळुन एकुण १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १९/०७/२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालया कडे राजेंद्र बळवंत हुजरे कनिष्ठ अभियंता शहर पाणीपुरवठा विभाग कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर यांचे विरुध्द तक्रारी अर्ज दिलेला आहे.

तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे आज दिनांक २१/०७/२०२२ रोजी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष राजेंद्र बळवंत हुजरे कनिष्ठ अभियंता शहर पाणीपुरवठा विभाग कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता पडताळणी मध्ये राजेंद्र बळवंत हुजरे कनिष्ठ अभियंता शहर पाणीपुरवठा विभाग कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर यांनी तक्रारदार यांचे दोन ग्राहकांचे नविन नळ पाणी कनेक्शन जोडणेचे प्रकरण मंजुर करुन तक्रारदार यांचेकडे रुपये १०,०००/- रुपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले. त्यानंतर राजेंद्र बळवंत हुजरे कनिष्ठ अभियंता शहर पाणीपुरवठा विभाग कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर यांचे शिवाजी मार्केट येथील कार्यालयात सापळा आयोजित केला असता राजेंद्र हुजरे यांनी तक्रारदार यांना गंगावेश परिसरातील केदारलिंग बेकरी येथे येणेस सांगीतले. त्या प्रमाणे त्या ठिकाणी सापळा आयोजित केला असता राजेंद्र बळवंत हुजरे कनिष्ठ अभियंता शहर पाणीपुरवठा विभाग कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारा समक्ष १०,०००/-रुपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांचे विरुध्द गुन्हा नोंद करणेची प्रक्रीया सुरु आहे.

सदर कारवाई श्री.राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त / पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,पुणे, श्री. सुरज गुरव अपर पोलीस उप आयुक्त / अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.आदिनाथ बुधवंत ,पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर श्री.नितीन कुंभार ,पोलीस निरीक्षक, श्रेणी पोलीस उप निरीक्षक संजीव बंबरगेकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल शरद पोरे, पोकॉ रुपेश माने व पोकॉ संदिप पडवळ ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे परिक्षेत्र,पुणे
दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३

३) श्री.आदिनाथ बुधवंत , पो.उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर ०२३१/२५४०९८९ ,9011228333

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक :- १०६४

५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३

Scanned by TapScanner